Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VIII Aug. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

मराठी कवितेतून घडणारे मानवी हक्कांचे दर्शन

डॉ. गोपाळ ओमाणा गावडे
मराठी विभाग प्रमुख, बी.ए.बी.एड्. विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
मोबा. ९४२११००५६२

मानव हा इतर प्राण्यांपेक्षा अधिक प्रगल्भ आणि त्यामुळेच विचारशील असणारा प्राणी आहे. मानव आपले हे वेगळेपण जपण्याचा प्रयत्न नेहमीच करत आला आहे. सृष्टीसोबत जगताना या वेगळेपणातून त्याला मानव म्हणून आपले काही हक्क, अधिकार असल्याची जाणीव झाली. या हक्क, अधिकारासाठी जगणे हा त्याचा इतिहास आहे. मानवी समाजीकरण, संस्कृतीकरण, अर्थकारण आणि राजकारण या सर्वांची रचना त्याने आपणास सुखी, सुदृढ, समाधानी, स्थिर आणि परिपूर्ण जीवन जगता यावे या भूमिकेतून झाली. या भूमिकेत जगण्यास स्वच्छ व मोकळा श्वास घेता येण्यापासून आरामदायी जीवन जगता येण्यापर्यंतच्या अनेक गोष्टींचा समावेश होतो. हा प्रवास प्रगतीचा जितका आहे तितकाच उपभोगाचा देखील आहे. त्यामुळेच मानवनिर्मित व्यवस्थेत मानवी हक्कांचे जतन कितपत होते हा चिंतेचा व चिंतनाचा प्रश्न बनला आहे.

मानव सृष्टीवर सत्ता मिळवता मिळवता आपल्यासारख्याच माणसावरही सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करू लागला किंवा त्याला आपली सत्ता टिकविण्यासाठी ते अपरिहार्य बनले असेही म्हणता येते. या घोडदौडीत त्याने निकोप मानवी जगण्याचा हक्कही धोक्यात टाकला. आणि मग मानवी हक्काच्या प्राप्तीसाठी संघर्षाचा इतिहास रचला गेला. मानवाला आपल्या हक्कांसाठी लढा द्यावा लागला, काहीवेळा त्याची सशस्त्रपणे मागणी करावी लागली. आपल्याच पृथ्वीवरती मानवाला आपल्या सुखी जगण्यासाठी लढा द्यावा लागावा हा तितकासा गौरवशाली इतिहास म्हणता येणार नाही.

मानवी हक्कांचा पहिला दस्तऐवज म्हणून मॅग्नाकार्टाचा जाहीरनामा ओळखला जातो. इंग्लंडमध्ये १२१५ मध्ये नागरिकांना हक्क प्रदान करणारा मॅग्नाकार्टा प्रकाशित करण्यात आला. याला मानवी हक्कांचा पहिला अधिकृत दस्तऐवज मानला जातो. सुनियोजित आणि शिस्तबद्ध जगण्यासाठी मानवाने नियम, कायदे आणि अनेक संस्था स्थापन केल्या. त्याचेच एक प्रातिनिधिक रूप म्हणजे मानवाला त्याचे हक्क आणि अधिकार बहाल करणारा हा जाहीरनामा होय. सत्तेच्या गुलामगिरीतून सुटका करून घेऊन स्वातंत्र्यासाठी झालेले लढे, क्रांत्या, युद्धे ही मानवी हक्कांची मागणी करणारे आहेत. अमेरिकन राज्यक्रांतीचा परिणाम स्वरूप १७७६ मध्ये थॉमस जेफरसन याने अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रकाशित केला. हा जाहीरनामा म्हणजे व्यक्तीला जीवन जगण्यासाठी आवश्यक मानवी हक्कांचा पुरस्कार करणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज होय. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये जगाला दिली. ही मूल्ये मानव म्हणून सुखी आणि स्थिर जीवन जगण्यासाठी आवश्यक मानवी हक्कच होते. भारताने तब्बल दिडशे वर्षे स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. हा संघर्ष गुलामगिरीतून सुटका व्हावी म्हणून जसा होता तसाच आपणास आपल्या हक्काची भूमी मिळावी जिथे आपण सुखी, सुस्थिर आणि निर्भयपणे जगू शकू या मागणीसाठीही होता. स्वातंत्र्याची ही मागणी लक्षात घेऊन स्वतंत्र भारताच्या संविधानात १२ ते ३२ या कलमांमध्ये नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले. मानवी हक्कांचे जतन करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे.

परिस्थितीच्या मागणीनुसार या हक्कांमध्ये काळानुसार भरच पडत गेलेली दिसते. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्याच्या हक्कांबरोबरच स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूलभूत जीवनमूल्ये स्वातंत्र्यसंग्रामाने मानवास दिली. त्यामध्ये नंतर अस्पृश्यता निवारण, सर्वधर्मसमभाव, पर्यावरण संरक्षण, शिक्षण, समान वेतन, धर्मस्वातंत्र्य, स्त्री-पुरूष समानता, शांततामय सहजीवन, बाल हक्क, श्रमिकांचे हक्क, स्त्री स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य यासारख्या अनेक हक्क, अधिकारांचा समावेश होतो. मानवाला आपल्या हक्क, अधिकारांची मागणी करावी लागावी हे वास्तव अनाचार, भ्रष्टाचार, अस्थैर्य यांची ग्वाही देणारे आहे तितकेच ते भयावह आणि हिंस्र देखील आहे. सृष्टीतत्वाशी संवाद साधणाऱ्या संवेदनशील कवीमनाला या वास्तवाने दुःख, वेदना होणे साहजिक आहे. कवीमन याविषयी कधी दुःखाचा स्वर काढते तर कधी तडफडते तर कधी शब्दांची शस्त्र बनवून मानवाला त्याच्या हक्काचे सुखी जीवन मिळावे म्हणून पेटून उठते. कवितेतील हा भाव मानवतावादी आहे. जो कवितेला मूल्य प्राप्त करून देतो. मराठी कवितेतील मानवी दुःखाचे दर्शन स्वातंत्र्याने मानवाला त्याचे हक्क, अधिकार नाकारले इतकेच नव्हे तर मूलभूत गरजा भागविण्यासाठीही निकोप वातावरण पुरविले नाही हे वास्तव कथन करते.

कुसुमाग्रजांच्या 'राजहंस माझा' या कवितेतून संवेदनशून्य माणुसकीचे दर्शन घडते. प्रेम, दया, करूणा, वात्सल्य या भावना विकासाच्या रेट्यामध्ये हरवून गेल्या आहेत. या मानवी जीवन मूल्यांसोबतच अन्नासाठी आगतिक, हतबल झालेला माणूस दिसतो. या कवितेतील स्वतःच्या मुलाचं कलेवर खाली टाकून उकीरड्यावर टाकलेलं कुजकं धान्य मिळविण्यासाठी धडपडणारी आगतिक, गरीब स्त्री या सगळ्याचे प्रतिनिधित्व करते. कुसुमाग्रज आपल्या 'वंदे-एक नाट्य' या कवितेत अशा परिस्थितीत सांस्कृतिक उन्नयन होऊ शकत नाही हे वास्तव मांडतात. या कवितेत कवीने स्वतंत्र भारताला प्रतिरूप रेखाटलेल्या नाट्यात भारदस्त उकीरड्यावर अन्न शोधणारं मळकट चिंध्या पेहरलेलं पाच-सात वर्षाचं कार्यमग्न पोर चित्रित केलेलं आहे. त्याला कवी 'वंदे मातरम्' म्हणायला सांगतो तर तो 'वंदे भाकरम्' अशी आरोळी देऊन विदिर्णतेला अधिक विकट करतो. कवी तस्कराच्या श्रीमंतीसारखा भारदस्त उकीरडा आणि स्नेहशील घराचा स्नेहशील व्हरांडा अशा विरोधाभास असणाऱ्या चित्रातून गरीब श्रीमंतीची दरीही स्पष्ट दाखवून देतो.

जीवन जगत असताना आपल्या हाताला काम मिळेल का? आणि आपले पोट भरेल का? हे मूलभूत प्रश्न मानवासमोर आहेतच. परंतु नुसते काम करणे आणि आयुष्यभर स्वतःचे पोट भरत मरून जाणे म्हणजे जीवन नव्हे. नारायण सुर्वे 'चार शब्द' या कवितेत कामगारांपुढचे मूलभूत प्रश्न अधिक तीव्र स्वरूपात मांडतात. नारायण सुर्वेंनी कामगार हा ही माणूस आहे हे दाखवून दिले आहे. राबणे, कष्ट करणे हा त्याचा धर्म असला तरी त्याला आणखी काही हवे आहे. साहित्यलेखन ही मक्तेदारी नसून साहित्य हे अभिव्यक्तीचे व्यक्तीला मिळालेले स्वातंत्र्य आहे. कामगार म्हणून जगत असताना खूप वर्षांपासून खूप काही पाहिलेले, सहन केलेले, अनुभवलेले आहे. त्या साऱ्यांचा परिचय समाजाला तर करून द्यायचाच आहे परंतु त्यापेक्षाही माणूस म्हणून जगत असताना कामगाराचीही काही स्वने, इच्छा असतात ज्याच्यामध्ये त्याच्या जगाची गंधवेणा असते. त्या साऱ्याचा लेखा-जोखा साहित्यात मांडणे हा माझा हक्क आहे असे सुर्वे म्हणतात. राजेरजवाडे आणि देवादिकांच्या स्वप्नरंजनात रमणाऱ्या साहित्याला आणि साहित्यिकांना माझे विचार, माझे शब्द आवडणार नाहीत. तरी सुद्धा 'सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे' असे सुर्वे ठणकावून सांगतात. सुर्वे पुढे म्हणतात, कामगारांना कोणाचे पाठबळ नसते. आम्हाला शब्दांचेच पाठबळ असते, शब्द हेच आमचे शस्त्र आहे. प्रत्येक मानवाला सुखी जगण्याचा हक्क आहे. पण हा हक्क कामगारांच्या हलाखीच्या परिस्थितीने हिरावून घेतला आहे. प्रत्येक माणसाला इच्छेनुसार जगण्याचा हक्क असतो. तो हक्क नारायण सुर्वे यांची कविता कामगाराला मिळवून देण्याचा प्रयत्न करते.

हिंदू धर्म परंपरेनुसार पती निधनानंतर स्त्रीला पुनर्विवाह करण्याचा हक्क नव्हता तर तिला त्याच्या चितेसोबत जिवंत जाळण्याची सतीची प्रथा हिंदू धर्मात अस्तित्वात होती. स्त्रीच्या जगण्याच्या हक्काची पायमल्ली करणारे

वास्तव अघोरी होते. अनेक समाजसुधारक, कवींनी याविरोधात आवाज उठवून स्त्री ला तिचे हक्क मिळवून दिले. नारायण सुर्व्यांची 'तेव्हा एक कर' ही कविता या स्त्री पुरूष समानतेचा उद्घोष करणारी आहे. लढवय्या कवी आपल्या पत्नीला सांगतो की, जेव्हा मी यअस्तित्वाच्या पोकळीत नसेन तेव्हा नवे हिरवे चुडे भरून तू नव्या आयुष्याला सामोरी जा. इतकेच नव्हे तर हा पती पत्नीला भावनांच्या गुंत्यात न अडकवता तिला नवं आयुष्य मला विस्मरून सुरु केलंस तरी चालेल हा विश्वास देतो. हा विश्वास देणारा कवी मराठी कवितेत महत्त्वाचा आहे. नारायण सुर्व्याच्या अशा अनेक कविता नव्या इतिहासाची सुरूवात करणाऱ्या आहेत.

पांढरपेशा वर्गाने वेश्या या स्त्री वर्गाचा सामान्य जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. या स्त्रीला सुर्वे आपल्या कवितेचा विषय बनवितात. वेश्या म्हणून केवळ आपलाच नव्हे तर आपल्या पुढच्या पिढीचाही सामान्य जगण्याचा हक्क हिरावून घेतला जाणार याची जाणीव 'मनिऑर्डर' मधील स्त्रीला आहे. बाहेरख्याली समाज आणि आगतिक गरीब स्त्री यांच्यातून जन्माला आलेली मुलं ही मानवी हक्कापासून जन्माअगोदर पासूनच वंचित राहतात. 'तुमचंच नाव लिवा' या कवितेतील स्त्री मुलाचं शाळेत नाव घालायला गेल्यानंतर मास्तरांना बापाच्या जागी 'तुमचंच नाव लिवा' म्हणते. यातील सहजता भयावह आहे. या स्त्रीची ही हतबलता समाजव्यवस्थेवर मानवी जीवनमूल्यांवर ओरखडा उमटवणारी आहे. मानवी जीवन मूल्यांपासून वंचित वर्गाला आत्मविश्वास देण्याचा प्रयत्न नारायण सुर्वे यांची कविता करते. अफाट कामगारवर्ग व त्यांच्या व्यथा यांना सुर्वे सहज कवितेचा विषय बनवितात आणि मराठी कवितेला उच्च मानवतावादी मूल्य प्राप्त करून देतात. पोटाचा प्रश्न तर आहेच पण या व्यतिरिक्त माणूस म्हणून सुखी, समाधानी जीवन जगता यायला हवं. ही गरजेतून कामगारवर्गाला प्रेरित करण्याचे मानवाचे उन्नयन घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुर्व्यांची कविता करते. कामगारांचा त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सुर्वे शब्दांची शस्त्रे करण्याचा गुन्हा करतात. ज्या वर्गाने हे हक्क नाकारले त्यांना सुनावतात. विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उद्घोष करणारी सुर्व्यांची कविता कामगार वर्गाला मानवी हक्क बहाल करण्यासाठी शेवटपर्यंत झटत राहते.

दलित कविता लेखन स्वातंत्र्याच्या आधारे पददलित, वंचित, गरीब वर्गाला त्यांचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न करते. केशव मेश्राम 'एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली' या कवितेत म्हणतात,

साल्या! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या फटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय?
बापाच्या बिडीकाडीसाठी भावाबहिणीची हाडके झिजवशील?
त्याच्या दारूच्या घोटासाठी भडवेगिरी करशील?
बाप्पारे! देवबाप्पारे तुला हे जमणारच नाही.

याच कवितेतून त्यांनी तुकडा तुकडा भाकरीसाठी शोषण केलं जाणाऱ्या महारमांगांच्या व्यथा वेदनांना चिथावणी देण्याचा प्रयत्न केला आहे.

कुसुमाग्रजांच्या 'इंदूबिंदूचे म्हणणे' या कवितेत कवीने वर्णभेदाचे माहिती तंत्रज्ञान युगातील एक नवे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. काळा वर्ण जन्मतःच लाभलेल्या इंदूबिंदू आणि साबणसुंदरी असे ते चित्र आहे. वस्त्र उणे होत जाताना दुणावणारे मोल एकीकडे तर दुसरीकडे जीतेपणाचीही लाज वाटावी अशी कुरूपता असा हा वर्णभेद आज विदारक वास्तव बनून समोर येत आहे. स्त्रीची किंमत कातडं कसं कमी करतं याचे हे चित्र कुरूप स्त्रियांची नव्या युगात कैफियत मांडणारे आहे.

असे बहिष्कृत जिणे। समाजाच्या पायतळी
सौंदर्याच्या कालिकेला। आम्हा कुरूपांचे बळी

कुरूपांचा हा विदिर्ण इतिहासही या निमित्ताने समोर येतो आणि बहिष्कृत वर्गात स्त्री वर्ग प्रामुख्याने कुरूप कातड्याला सामावून घेतो.

मानवी हक्कांवर आक्रमण हे अनादी कालापासून सुरूच आहे. मानवी हक्क हे प्रत्येकाला मिळाले पाहिजे हा आग्रह संतसाहित्यापासून होताना दिसतो. भागवत संप्रदाय हा तर तत्कालीन समाजातील भेदभाव, जातीभेद, उच्च नीचता दूर करण्याच्या प्रेरणेतून निर्माण झाला. संत तुकाराम अभंगात म्हणतात,

खेळ मांडियेला वाळवंटी घायी।
नाचती वैष्णव भाई रे।
वर्ण अभिमान विसरली याती।
एकऐकी लोटांगण जाती रे।।

अस्पृश्यतेचा प्रश्न तर १९ च्या शतकापर्यंत अस्तित्वात होता व आजही काही ठिकाणी त्याच्या प्रतिक्रिया उमटताना दिसतात. केशवसुतांच्या 'अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न' या कवितेतील मुलाला प्रश्न पडतो की, 'जरी त्यावरी सावली माझी गेली। तरी काय बाधा असे ठेवियली।' केशवसुत असो किंवा सुर्वे ते समाजातील भेदाभेद दूर करुन समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. समतेचा उद्घोष करणाऱ्या केशवसुतांच्या कविता आहेत.

ब्राह्मण नाही हिंदूही नाही न् मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखंडिती प्रदेश साकल्याचा

या एकतेच्या संकल्पनेत मीपणा जळून जातो आणि साकल्याचा प्रदेश साकारला जातो.

कवी हा नेहमीच आशावादी असतो. तो विश्वाचे हित चिंतणारा असतो. असे असले तरी आजचे वास्तव त्यालाही हतबल करणारे तर काही वेळा संताप आणणारे आहे. आज ६० ते ८० वर्षापासून नुकत्याच जन्मलेल्या मुलीवर होणारे बलात्कार, अन्न-पाण्याअभावी जनावरा-कुत्र्यांसोबत मरणारी माणसं, चिमुकल्यांसह आत्महत्या करणाऱ्या आया, कर्जबाजारी शेतकरी या सर्वातून लयाला जाणारी व्यवस्था दृष्टीस पडते आणि यामुळे कवीमन तडफडते. माणसाच्या हक्कांवर गदा तर आलेली आहेच पण माणूस संपविण्याचा धंदा या व्यवस्थेने सुरू केला आहे असे अनिल फराकटे सारखा कवी म्हणतो. विनोद कुमरे सारखा कवी म्हणतो,

हा जगण्याचा छिन्न भिन्न अनुभव
उत्तुंग फेरफटका मारतोय बिल्लीचभर पाण्यात
मोर्चाबिर्चा, चळवळीचं सांगत नको जाऊस भाऊ
गुडघाभर पाण्यात बुडवून टाक ती चळवळ
सपशेल बुडवून टाक क्षितिजाआड दडलेला सूर्य

आजच्या परिस्थितीला नवा सूर्य दिसत नाही. स्वातंत्र्यासाठी मोर्चा, क्रांत्या झाल्या, आज हक्कांसाठी आंदोलनं, संप होतात परंतु सगळ्याची परिणीती आज शून्य आहे. सगळीकडे अंधार भरून राहिलेली ही परिस्थिती माणसाच्या जगण्यास पोषक वातावरण पुरवत नाही. कवीने अशा सुंदर, सुखी, संपन्न आयुष्याचं स्वप्न पाहणे हे एका सुंदर चित्रासारखे आहे. या स्वप्न आणि अपेक्षाभंगाने कवी दुःखी होतो. सततची ही परिस्थिती माणसासोबत कवीला बोथट करते. वीरधवल परब म्हणतात,

आपण अस्वस्थ होत नाही हल्ली
कुठे दक्षिणेत दलितांना एकमेकांची विष्ठा खायला लावली

याच कवितेत ते पुढे म्हणतात,

फिकीर वाटतच नाही मग आपल्याला
उन्हातान्हात राबराबून दिवसाकाठी वीस रुपयेही
कमावू न् शकलेल्या
आपल्याच कोट्यवधी बांधवांबद्दल
ट्रकखाली हकनाक चिरडून मेलेल्या
फुटपाथवरच्या नागरिकांबद्दल
आपण म्हणतो,
फुटपाथ ही काय झोपायची जागा आहे?

कवी नागरिक हा शब्दप्रयोग उपहासाने करून आपला देश नागरिकांच्या अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजाही पुरविण्याची जबाबदारी पार पाडत नाही. आजही हे वास्तव बदललेले नाही. कवी बंधुभावाचे मूल्य तर पायदळी तुडविले गेल्याचे स्पष्टच सांगतो.

आजच्या भयावह आणि दहशतीच्या वातावरणाने फुला-मुलांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. अनेक कवींना या वास्तवाने होरपळून जाणारी मुले अस्वस्थ करतात. सौमित्र सारखा कवी अगदी अलीकडच्या 'पेशावर' कवितेत म्हणतो,

कशासाठी ठेऊ नये त्याने शाळेत आता पाय
मारला गेलाय त्याचा मित्र म्हणजे नक्की झालंय काय?
कोवळ्या डोळ्यात शंभर संभ्रम अशीच आता आलीय वेळ
बदलू लागलेत आपोआपच मुलांचेही आता खेळ

पेशावर हा आतंकवादाचे केंद्र मानले जाते. या कवितेला 'पेशावर' शीर्षक देण्याने कवी खूप काही साधतो. आजची बालकं ही उद्याचा देश घडवणारी असतात. परंतु या हिंसेच्या वातावरणाला सरावणारी मुलं देशाचं कोणत्या प्रकारचं भविष्य घडवणार आहेत या प्रश्नाने विचारी मन अस्वस्थ न होईल तर नवल. सौमित्र 'एफ.एस.आय.' या कवितेत मानवाने पर्यावरणीय घटकांचाही आपण जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे हे सांगतात. सृष्टी ही सर्वांची आहे. परंतु माणूस पृथ्वीवर सत्ता मिळविण्यासाठी प्रगतीच्या नावाखाली आक्रमण करत चालला आहे. कवी म्हणतो,

इथल्या केळी, पोफळी, माड, आंबा, फणस
सुपाऱ्यांना अजून थोडं थोडं
सरकून घ्यायला सांगितलं पाहिजे
परवाच नजिकचं एक शहर
त्याच्याही बाहेर अजून वाढवण्याची
कायदेशीर परवानगी मिळवण्यात आलीये

यासारख्या उदाहरणातून स्पष्ट होते की स्वातंत्र्यानंतरची परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिक बिघडत चालली आहे. माणूस त्याला आवर घालू शकत नाही आहे. हे वास्तव मानवी हक्कांना नाकरणारं आहे आणि एक साम्राज्य निर्माण करण्याकडे वाटचाल करणारं आहे.

समारोप–

सुखी, समाधानी जगणे हा मानवी हक्क आहे. परंतु हक्कांसाठी झगडावे लागणे हा मानवनिर्मित परिस्थितीचा परिणाम आहे. मानवाने निर्माण केलेला समाज, संस्कृती, संस्था, नियम, कायदे हे मानवालाच डावलू लागतात तेव्हा समर्ग मानव जातीच्या मुक्तीसाठी शब्दांचे शस्त्र कवीला हाती घ्यावे लागते हे प्रत्येक काळात घडताना दिसते. हे शस्त्र किती धारदार आणि परिणामकारक ठरते हे नारायण सुर्व्यांसारख्या कवीच्या शब्दातून तर सहजच प्रत्ययाला येते. मानवी जीवन सुखी, समृद्ध व संपन्न करणे व मानवी जगण्यासाठी निर्भय भूमी निर्माण करणे हे कवी आपले आद्य कर्तव्य मानतो. मराठीतील प्रत्येक कवीची कविता हे कर्तव्य पार पाडते.

संदर्भ–

१) कुमरे विनोद *अनुभव* आपले वाङ्मय वृत्त, अंक पाचवा, डिसेंबर २०१४, पृ. ६
२) कुसुमाग्रज *मुक्तायन* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण २०००.
३) (संपा.) पंडित भ. श्री *समग्र केशवसूत* व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७८ पृ. २५० व १५०.
४) परब वीरधवल *फुटपाथ ही काय झोपायची जागा आहे?* आपले वाङ्मय वृत्त अंक तिसरा ऑक्टोबर २०१५ पृ. ११.
५) (संपा.) मेश्राम केशव *विद्रोही कविता* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २ री आवृत्ती, १९८७ पृ. ४७–४८.
६) सुर्वे नारायण *सनद* ग्रंथाली प्रकाशन, २ री आवृत्ती १९८५.
७) सौमित्र खेळ अंक ३१ मार्च २०१५ पृ. ६८ व ७४